# जाधव महाविद्यालय-क्विक हिलमध्ये कमवा व शिका सामंजस्य करार

**आळेफाटा, ता. २६ :** आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्यामध्ये कमवा व शिका योजनेसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या करारातून विद्यार्थ्यांना आर्थिक मदत प्राप्त होणार आहे, अशी माहिती प्रा. प्रवीण जाधव यांनी दिली. याच अनुषंगाने बी.सी.ए, बी.सी.एस विभागातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या वेळी फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी सुगंधा दानी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, "या उपक्रमाचा उद्देश शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे ज्ञान देणे व सामाजिक साक्षरता वाढवणे हा आहे. या करारातून विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व व्यवहारिक अनुभव प्रदान होईल."

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरूण हुलवळे, संचालक भाऊ कुऱ्हाडे, किशोर कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदिप गुंजाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी विद्यार्थी समन्वयक म्हणून तृतीय वर्ष (संगणक) मधील गौरी पादीर व शिक्षक समन्वयक म्हणून प्रा. नूतन जोशी, प्रा. सर्जेराव थोरात, प्रा. असिया शेख हे काम करणार आहेत.